॥ या विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

## ACADEMIC (APPROVAL) SECTION

Phone: (02462) 215242

website: srtmun.ac.in

E-mail:approval@srtmun.ac.in

## परिपत्रक

विषय : घडयाळी तासिका तत्वावरील सहाय्यक प्राध्यापकांच्या नियुक्तीबाबत.

संदर्भ : १) शासन निर्णय क्र.संकीर्ण—२०१८/(९८५/१८)/मशि—३, दि. १४/११/२०१८
२) शासन निर्णय क्र.२०२१/प्र.क्र.१८१/२१/विशी—१ दि. १७/१०/२०२२

उपरोक्त विषयी प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत सर्व संलग्नित अशासकिय अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य यांना कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्ती करीता महाराष्ट्र शासनाने संदर्भीय क्र.२ च्या शासन निर्णशान्वये कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील सर्व सूचना विचारात घेऊन त्यात नमुद केलेल्या कालबध्द कार्यक्रमानुसार अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीची कार्यवाही करावी. सदर शासन निर्णय स्वयंस्पष्ट असून कार्यवाही करतांना शासन निर्णयातील कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सदर परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा व शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे काटेकोरपणे कार्यवाही करुन प्रस्ताव स्थानिक मुलाखती संपन्न झाल्यानंतरच्या दिवसापासून सांत दिवसाचे आत **(Soft & Hard Copy)** सह संपुर्ण प्रस्ताव सादर करावा.

सूचना: स्थानिक निवड समिती मार्फत पद भरतीसाठी आवश्यक नमुने **(Formats)** विद्यापीठाच्या **(www.srtmun.ac.in)** या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

ज्ञानतिर्थ विष्णूपुरी,नांदेड—४३१ ६०६ §
जावक क्र.शैक्षणिक/मान्यता/घ.ता/962 §
दिनांक: २१ डिंसेबर, २०२२ §

उपकुलसचिव
शैक्षणिक (मान्यता) विभाग

सोबत:—शासन निर्णय दिनाक १७/१०/२०२२

प्रत:

१) मा.प्राचार्य, सर्व संलग्नीत अशासकीय अनुदानित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र—कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग नांदेड.
४) सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.

तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीकरिता कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१८१/२१/विशि-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- १७ ऑक्टोबर, २०२२

<u>वाचा</u> :-

१) शासन निर्णय समक्रमांक दिनांक १० ऑगस्ट,२०२१.
२) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/(१८५/१८१)/ मशि-३ दिनांक १४ नोव्हेंबर,२०१८
३) संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/ता.त./मवि-०१/१६०६अ, दि.२१फेब्रुवारी,२०२२.

<u>प्रस्तावना</u> :-

नेट-सेट / पी.एचडी. धारक संघर्ष समितीच्या विविध मागण्यांबाबत मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७ जून, २०२१ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे बैठक झाली होती. सदर बैठकीत "तासिका तत्वाच्या धोरणात सुधारणा करण्यासाठी शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात यावी," असे निर्देश मा. मंत्री महोदयांनी दिले होते. त्यानुसार तासिका तत्वावरील नियुक्तीच्या धोरणाचा आढावा घेऊन नवीन पर्यायी धोरणाबाबत शासनास शिफारस करण्यासाठी शासन निर्णय दि.१० ऑगस्ट, २०२१ अन्वये संचालक, उच्च शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय समिती गठित करण्यात आली होती. समितीने आपला अहवाल दिनांक २१ फेब्रुवारी,२०२२ च्या पत्रान्वये सादर केला आहे.

तासिका तत्वाच्या धोरणासंदर्भात उपरोक्त समितीने विविध ९ शिफारशी केल्या आहेत. त्यापैकी तासिका तत्वावरील अध्यापकांनी विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणे (शिफारस क्रमांक ४) व तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीसाठी कार्यपध्दती विहित करणे (शिफारस क्रमांक ६) येथील शिफारशी स्विकारण्यास शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच तासिका तत्वावरील अध्यापकांच्या मानधनात वाढ करणे (शिफारस क्रमांक १), तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधन नियमित अध्यापकांप्रमाणे थेट बँक खात्यावर जमा करणे (शिफारस क्रमांक २), शिल्लक कार्यभारावर तासिका तत्वावरील अध्यापकाची नियुक्ती करणे (शिफारस क्रमांक ३) येथील शिफारशी विभागाने प्रस्तावित केलेल्या बदलांसह स्विकारण्यास शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच, तासिका तत्वावरील अध्यापकांना केलेल्या सेवेचे अनुभव प्रमाणपत्र देणे (शिफारस क्रमांक ५), तासिका तत्वावरील अध्यापकांना परीक्षाविषयक पर्यवेक्षण व मूल्यांकनांचे काम देणे (शिफारस क्रमांक ७), तासिका तत्वावरील अध्यापकांची त्याच महाविद्यालयांमध्ये पुनर्नियुक्ती करावयाची असल्यास नव्याने कार्यपध्दती राबविण्यात येऊ नये (शिफारस क्रमांक ८) व प्रचलित आरक्षण धोरणानुसार तासिका तत्वावरील अध्यापकांची नियुक्ती करणे (शिफारस क्रमांक ९) या शिफारशी नाकारण्यात आल्या आहेत. त्यानुषंगाने आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

१. शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या पहिल्या दिवसापासून तासिका तत्वावरील अध्यापकांच्या सेवा उपलब्ध होऊन शैक्षणिक कामकाज सुरळीतपणे पारपाडता यावे याकरिता तासिका तत्वावरील अध्यापकांची प्रत्येक वर्षी नियुक्ती करण्यासंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे:-

उपलब्ध कार्यभार निश्चित करणे, संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या स्तरावरून नाहरकत प्रमाणपत्र देणे, व्यवस्थापन स्तरावरील जाहिरात व निवड पध्दती, विद्यापीठ मान्यता या बाबींचा कालबध्द कार्यक्रम

खालील कोष्टकात नमूद करण्यात आला आहे. सदर कालबध्द कार्यक्रमानुसार संबंधित महाविद्यालय, विद्यापीठ व सहसंचालक, उच्च शिक्षणा यांनी समन्वय साधून, ऑनलाईन प्रणालीव्दारे कार्यवाही करावी.

| क्र. | कार्यवाहीचा तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | कार्यभार तपासणी | १५ फेब्रुवारी |
| २ | ना-हरकत प्रमाणपत्र मागणी | ०१ मार्च |
| ३ | ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करणे | १५ मार्च |
| ४ | जाहिरात प्रसिध्द करणे | ०१ एप्रिल |
| ५ | अर्ज तपासणी, मुलाखत, उमेदवाराची निवड | १५ एप्रिल |
| ६ | नेमूणक आदेश निर्गमित करणे | ३० एप्रिल |
| ७ | विद्यापीठ मान्यता | ३१ मे |
| ९ | तासिका तत्वावरील अध्यापकाची सेवा उपलब्ध करून देणे | शैक्षणिक वर्षारंभ १५ जून |

२. संबंधित महाविद्यालयाने तासिका तत्वावरील अध्यापकाची विहित कार्यपध्दतीनुसार नियुक्ती झाल्याची खात्री करावी. तद्नंतर तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधन वेळेवर अदा करण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांसह, परिपूर्ण प्रस्ताव सहसंचालक, उच्च शिक्षण यांना सादर करावा. सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होत असल्याची खात्री करावी आणि तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधन संबंधित महाविद्यालयामार्फत थेट बँक खात्यामध्ये जमा करण्याची कार्यवाही करावी. तसेच, तासिका तत्वावरील मानधन अदा करण्याबाबतचा दस्ताऐवज कार्यालयात जतन करून ठेवावा.

३. एका पूर्णवेळ रिक्त पदाकरिता फक्त दोनच तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नेमणूका करण्यास तसेच, एका अध्यापकाकडे जास्तीत जास्त ९ तासिकांचा कार्यभार सोपविण्यास दिनांक १४ नोव्हेंबर,२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. वरीलप्रमाणे अध्यापकांकडे कार्यभार सोपविल्यानंतर देखील कार्यभार शिल्लक राहात असल्यास उर्वरित कार्यभारासाठी तासिका तत्वावरील अध्यापकाची नियुक्ती करता येईल. तथापि, उर्वरित कार्यभार हा किमान नऊ तासिकांचा असेल याची दक्षता घ्यावी.

४. अकृषि विद्यापीठे व संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये नियुक्त करावयाच्या अध्यापकांकरिता विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य शासनाने वेळोवेळी शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता विहित केल्या आहेत. तासिका तत्वावरील अध्यापक म्हणून नियुक्तीकरिता उमेदवाराने उपरोक्त अर्हता धारण करणे बंधनकारक राहील.

५. तासिका तत्वावरील नियुक्ती शैक्षणिक वर्षासाठी मर्यादित असून सदर नियुक्ती पूर्णवेळ नियुक्ती नाही. तसेच महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१ मध्ये सदर अधिनियम तासिका

तत्वावरील नियुक्त्यांना लागू असण्याबाबत कोणतीही तरतूद अंतर्भूत नाही, त्यामुळे तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्त्यांना आरक्षण लागू होणार नाही.

६. सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.८०/२०२२/१६-ब (सी), दि.३१.०५.२०२२ अन्वये दिलेल्या अभिप्रायानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२२१०१७१२२३२५११०८ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT
MADHUKARRAO
BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=deb45560947f8c7f30e7f1f9a8360c0f8600a542859e8fe229d6ea33341 5e8d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=99EB928028DF71EBDFCD2898E209D499192AD3899261FEAD42F7D38A3141AB69, cn=AJIT MADHUKARRAO BAWISKAR
Date: 2022.10.17 17:43:11 +05'30'

(अजित बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई,
२) मा. मुख्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) स्वीय सहायक, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
६) सर्व सह सचिव/ उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) कुलगुरू, सर्व अकृषि विद्यापीठे
८) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
१०) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
११) निवड नस्ती (विशि-१).

******************

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे दर सुधारित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१८/(१८५/१८)/मशि-३,

मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२.

दिनांक : १४ नोव्हेंबर, २०१८.

वाचा: शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.टीईडी-२००८/(१८३)/०८/तांशि-५, दिनांक ०५ नोव्हेंबर,२००८

प्रस्तावना :-

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सैद्धांतिक, प्रात्यक्षिके इत्यादी कामांकरीता संदर्भाधीन शासन निर्णयान्वये अभ्यांगत अध्यापकांचे मानधनाचे दर निश्चित करण्यात आले आहेत. संदर्भाधीन शासन निर्णयान्वये लागू करण्यात आलेले मानधनाचे दर सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत सर्वांगीन विचार करुन खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या अभ्यांगत / तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाच्या दरात या शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचा प्रकार | दिनांक ०५.११.२००८ च्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय असलेले दर (प्रति तासाकरीता) | | सुधारित दर (प्रति तासाकरीता) | |
|---|---|---|---|---|---|
| | | सैद्धांतिक | प्रात्यक्षिके | सैद्धांतिक | प्रात्यक्षिके |
| १. | कला, वाणिज्य, विज्ञान (पदवी) | रु. ३००/- | रु. १५०/- | रु.५००/- | रु.२००/- |
| २. | कला, वाणिज्य, विज्ञान (पदव्युत्तर) | रु. ३००/- | रु. १५०/- | रु.६००/- | रु.२५०/- |
| ३. | शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षण (पदवी/ पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम) | रु. ३००/- | रु. १५०/- | रु.६००/- | रु.२५०/- |
| ४. | विधि (पदवी / पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम) | रु. ३००/- | रु. १५०/- | रु.६००/- | रु.२५०/- |

२. वरील सुधारीत दर पुढील अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात यावे. :-

१) तासिका तत्वावर अध्यापकाची नियुक्ती करण्यापूर्वी संस्थेतील संबंधित विद्याशाखेतील सर्व शिक्षकीय तसेच प्रशासकीय पदावर काम करणाऱ्या शिक्षकांना प्रमाणकानुसार शैक्षणिक भार देण्यात आला आहे याची खात्री करण्यात यावी.

२) तासिका तत्वावरील अध्यापकांची नियुक्ती करण्यापूर्वी विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) यांचे कार्यालयाकडून संबंधित विषयाचा कार्यभार तपासून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

३) एका पूर्णवेळ रिक्त पदाकरिता फक्त दोनच तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नेमणुका करता येतील. एका अध्यापकाकडे जास्तीत जास्त ०९ तासिकांचा कार्यभार सोपविता येईल.

४) संस्थेने विद्यापीठ मान्यतेने जाहिरात देऊन विद्यापीठ अनुदान आयोग/ शिखर संस्था/ शासन यांनी वेळोवेळी विहित केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रताधारक अध्यापकांची स्थानिक निवड समितीमार्फत निवड करावी. ज्यामध्ये संस्थाप्रमुख, प्राचार्य, विभागप्रमुख व एक बाह्य विषय तज्ज्ञ असावा.

५) तासिका तत्वावरील अध्यापकांची एका शैक्षणिक वर्षासाठी जास्तीत जास्त ०९ महिन्यांसाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात यावी व त्यास विद्यापीठाची मान्यता घेण्यात यावी. त्यानंतर ही नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

६) तासिका तत्वावरील नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती असल्याने त्यास नियमित सेवेचे कोणतेही हक्क प्राप्त होत नाहीत, त्यामुळे भविष्यात सेवेत कायम करण्याची मागणी/ नियमित सेवेच्या कोणत्याही हक्काची मागणी करणार नाही, तसेच त्यास एकावेळी एकाच महाविद्यालयात काम करता येईल, असे हमीपत्र रु. १००/- स्टॅम्प पेपरवर संबंधित अध्यापकाकडून रुजू होते वेळी घेण्यात यावे.

७) तासिका तत्वावरील कोणत्याही उमेदवारास एकाच महिन्यात त्याच्या दर्जाच्या अनुज्ञेय वेतनश्रेणीतील सुरुवातीच्या वेतनश्रेणीच्या रक्कमेपेक्षा जास्त मानधन दिले जाणार नाही याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/संस्थेचे संचालक तसेच सहसंचालक, उच्च शिक्षण यांची राहील.

८) तासिका तत्वावरील नियुक्त अध्यापकांना त्यांचे मानधन दरमहा नियमित स्वरुपात सेवार्थ/एचटीई सेवार्थ प्रणालीमार्फत अदा करण्यात यावे.

९) महाविद्यालयात कार्यरत पूर्णवेळ अध्यापकांना तासिका तत्वावरील दिलेली अतिरिक्त नियुक्ती मान्य केली जाणार नाही अथवा मानधन मिळण्यास पात्र होणार नाही.

१०) अभ्यांगत निमंत्रित हे संबंधित अभ्यासक्रमाशी निगडित व्यवसायातील तज्ज्ञ व्यक्ती पुरते मर्यादित राहतील. अशा अनुभव संपन्न व्यक्तींना व्याख्यानासाठी पाचारण करण्यात यावे, मात्र त्यांना अभ्यास पूर्ण करण्याच्या दृष्टीने निमंत्रित करण्यात येऊ नये.

११) प्रत्यक्ष उपलब्ध कार्यभार आणि तासिका तत्वावरील मानधन अदायगीबाबत काही अनियमितता आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/संस्थेचे संचालक तसेच सहसंचालक, उच्च शिक्षण यांची राहील.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.७०८/२०१८/व्यय-५. दि.०१.०९.२०१८ अन्वये प्राप्त सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०१८१११४१२२९३९०५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Hemantkumar Pandharinath Baviskar

(हे.पं.बाविस्कर)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सहसंचालक, उच्च शिक्षण, सर्व विभागीय कार्यालये, महाराष्ट्र राज्य.
३. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १-२, मुंबई / नागपूर.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १-२, मुंबई / नागपूर.
५. वित्त विभाग, व्यय ५, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव/मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
७. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कार्यासन अधिकारी.
८. निवड नस्ती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग/मशि-३.